# इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया, पुणे सन २०१६-१७

## विशेष फेरी-३ प्रसिध्दी निवेदन

दि.२६.०८.२०१६.

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांचे इयत्ता ११वी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ चे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने होत आहेत.

वेळापत्रकानुसार विशेष फेरी-३ ची गुणवत्ता यादी शुक्रवार दि २६.०८.२०१६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता प्रसिध्द करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी या यादीतील प्रवेश वेळापत्रकानुसार सोमवार दि. २७ ऑगस्ट २०१६ सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत, व दिनांक २९ व ३० ऑगस्ट २०१६ रोजी सकाळी ११.०० ते ५.०० वाजेपर्यंत प्रवेश घ्यावेत.

विशेष फेरी -३ मधील प्रवेशाची माहिती पुढीलप्रमाणे :-

| अ. .क्र. | शाखा | विशेष फेरी-३ साठी रिक्त जागा | विशेष फेरी-३ साठी प्राप्त अर्ज | विशेष फेरी-३ साठी प्रवेश दिलेले |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | कला (मराठी) | ३०६७ | ७९ | ७६ |
| २ | कला (इंग्रजी) | २९४२ | १०३ | ७० |
| ३ | कॉमर्स (मराठी) | १६४७ | २८५ | २६८ |
| ४ | कॉमर्स (इंग्रजी) | ३७८६ | ९४४ | ५१९ |
| ५ | विज्ञान (इंग्रजी) | ६५४८ | ११७२ | ७८६ |
| एकुण | | १७९९० | २५८३ | १७१९ |

विशेष फेरी-३ मधील ॲलोकेशन झालेल्या २५८३ विद्यार्थ्यांपैकी पहिल्या पसंती क्रमांकाचे ६७६ विद्यार्थ्यांना व ३१८ विद्यार्थ्यांना दुस-या पसंती क्रमांकाचे कनिष्ठ महाविद्यालय मिळालेले आहेत.

### विशेष फेरी-३ मधील विद्यार्थ्यांसाठी सूचना :-

१) इ. ११वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या **http://pune.fyjc.org.in** या संकेतस्थळावर आपला ऑनलाईन ॲप्लीकेशन फॉर्म क्रमांक टाकुन कोणते कॉलेज मिळाले आहे ते पाहावे.

२) विशेष फेरी-३ मधील विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्यासाठी माहिती पुस्तिकेत नमूद केल्याप्रमाणे मूळ कागदपत्रे महाविद्यालयात सादर करुन दिलेल्या वेळापत्रकानुसार प्रवेश निश्चित करावा. (दि. २७ ऑगस्ट २०१६ सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत व दि. २९ व ३० ऑगस्ट २०१६ सकाळी ११.०० ते ५.०० वाजेपर्यंत ) कोणत्याही परिस्थितीत वेळ वाढवून दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

चौथी विशेष फेरी आयोजन जुलै २०१६ मध्ये घेण्यात आलेल्या इ. १० वी शालान्त पुरवणी परीक्षेच्या निकालानंतर सविस्तर माहिती व वेळापत्रक जाहिर केले जाईल.

सदरचे प्रसिध्दीपत्रक इ. ११वी ऑनलाईन केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या **http://pune.fyjc.org.in** या संकेतस्थळावर व शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे या कार्यालयाच्या **www.dydepune.com** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

MRaut 26.8.16

(मिनाक्षी राऊत)
सचिव
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
सहा.शिक्षण संचालक
पुणे विभाग पुणे-१